# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.मुंबई

भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, नायगांव-वडाळा रोड, मुंबई - ४०० ०३१.

दूरध्वनी क्र.: २४१३५७९७,२४१५११८५ • E-mail: admin@mucbf.com • web: www.mucbf.com

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

## (फक्त सभासदांकरिता)

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक **२८ सप्टेंबर**, **२०२४** रोजी **दुपारी ०२.३०** वाजता मा.अध्यक्ष श्री. अजय ब्रम्हेचा यांच्या अध्यक्षतेखाली '**कॉसमॉस टॉवर, दुसरा मजला, १३२/बी, गणेशिखिंड रोड, रेंज हिल कॉर्नर, आयसीएस कॉलनी, पुणे**' येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया आपण सदर सभेस अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन ती क्षमापित करणे.

२. दि. ३० सप्टेंबर,२०२३ रोजी झालेल्या ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

३. मा. अध्यक्ष यांनी सादर केलेला सन २०२३-२४ चा वार्षिक अहवाल, दि. ३१ मार्च, २०२४ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, तसेच सन २०२३-२४ चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहीत स्वीकृत करणे.

४. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०२४ अखेरच्या वाढावा विभागणीस मंजुरी देणे.

५. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६. फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता अंतर्गत लेखापरीक्षक आणि शासन मान्यताप्राप्त लेखापरीक्षकांच्या नामतालिकेतील वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

दिनांक :२८/०८/२०२४

ठिकाण : मुंबई

**सायली भोईर**

मुख्य कार्यकारी व सचिव

**विशेष सुचना :** फेडरेशनने आयोजित केलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर सन २०२३-२४ मध्ये उत्तम कामगिरी केलेल्या सभासद नागरी सहकारी बँकांना फेडरेशनच्यावतीने सर्वोत्कृष्ट बँक पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

**टिप :** १) किमान गणसंख्येअभावी सभा स्थगित झाल्यास, अशी स्थगित झालेली सभा अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) सभेपूर्वी (दुपारी १:०० वाजता) भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे, त्याचा प्रतिनिधींनी अवश्य लाभ घ्यावा.

३) सभेस उपस्थित राहणाऱ्या सभासद बँकांच्या प्रतिनिधींना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास सभेच्या दिनांकापूर्वी सात दिवस अगोदर फेडरेशनच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी सादर करावेत.

४) वार्षिक सर्वसाधारण सभेस येणाऱ्या प्रतिनिधींनी आपली नावे आम्हास नियोजनाच्या दृष्टीने मंगळवार, दि. १७ सप्टेंबर, २०२४ पर्यंत कळवावी, ही विनंती.